International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.1 Sept-Oct 2023

# आत्मपर साहित्य संकल्पना व स्वरूप

**श्री. लक्ष्मण बाजीराव बिटाळ**
आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालय, शेवगाव जि. अहमदनगर
**Corresponding Author – श्री. लक्ष्मण बाजीराव बिटाळ**
**DOI- 10.5281/zenodo.10250354**

**प्रास्ताविक :**

मराठी भाषेमध्ये कथा, कादंबरी, चरित्र आणि आत्मचरित्र हे कथनात्मक वाङ्मयप्रकार आहेत. कथा, कादंबरीच्या लेखनासाठी कल्पित कथानक तयार करावे लागते. आत्मपर लेखनात मात्र कल्पकतेला वाव नसतो. लेखक स्वतः आयुष्यभर जे जगला, त्याने जे दुःख अनुभवले, जो संघर्ष केला, जे कर्तृत्त्व संपादीत केले ते सांगण्यासाठी तो आत्मपर लेखनाची निवड करतो. आत्मचरित्रपर लेखनामागे आत्माविष्काराची प्रेरणा, आत्मजीवनाच्या अर्थपूर्णतेची अभिज्ञा, स्वानुभवातील निवडीची दृष्टी आणि लेखनशैली विषयक भान अशा गोष्टी प्रेरक असतात. तसेच ऐतिहासिक साहित्यकृती प्रमाणे विशिष्टतेकडून सामान्यत्वाकडे जाण्याची क्षमता त्यात असते. म्हणूनच आत्मपर लेखन एक ललित गद्य प्रकार मानला जातो. वस्तुनिष्ठपणे लिहिलेले आत्मपर साहित्य समीक्षकांसाठी अभ्यासाचे विषय ठरले आहे.

**आत्मपर साहित्य संकल्पना व स्वरूप :**

भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञानाच्या प्रांतात आत्मशोध ही प्रेरणा प्राचिन युगापासुन आढळते. हा शोध अध्यात्मिक, तात्विक व पारलौकिकतेच्या पातळीवरील असतो. मात्र आत्मपर साहित्यातील आत्मशोध हा भौतिक पातळीवरील असून तो दैनंदिन मानवी जीवनाशी संबंधित आहे. मानव आपल्या जीवनामध्ये अनेक प्रकारचे अनुभव घेतो. ते स्वानुभव व स्वचरीत्र जेव्हा शब्दरूप धारण करते तेव्हा ते लेखन आत्मपर लेखन ठरत असते. आत्मपर साहित्यामध्ये आत्मचरित्र, आत्मकथन व स्वकथन यांना विशेष रूपबंध असल्याने त्याच्या संकल्पनांचा व स्वरूपाचा येथे शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**आत्मचरित्र संकल्पना व स्वरूप :**

'आत्मचरित्र' हा शब्द इंग्रजी autobiography या शब्दावरून आला आहे. स्वतःच स्वतःचे जीवनदर्शन शब्दातून घडवणे असा त्याचा अर्थ आहे. आत्मचरित्र या संकल्पनेमधील 'चरित्र' हा शब्द 'चर' या धातूपासून तयार झालेला आहे. 'चर' म्हणजे चालणे किंवा पुढे जाणे. याचा अर्थ माणूस जे आयुष्य जगतो ते जगण्याचे अंतर असा अर्थ घेता येतो. आत्मचरित्र म्हणजे विशिष्ट व्यक्तीने जीवन प्रवासात चाललेले अंतर असते. आपल्या जीवन प्रवासात लेखक जे भले बुरे अनुभव घेतो त्याचा व आत्मशोधाचा आविष्कार आत्मचरित्रात येत असतो. इनसायक्लोपिडीआ ब्रिटानिकामध्ये "Autobiography the account of an individual human life written by the subject himself."1 अशी व्याख्या दिली आहे. लेखकाचे अनुभव व ते घेणारे लेखकाचे व्यक्तित्व आत्मचरित्रात साकार व्हावे अशी अपेक्षा असते. काही अभ्यासकांनी दिलेल्या आत्मचरित्राच्या संज्ञा पाहिल्यास आत्मचरित्राची संकल्पना अधिक स्पष्ट होते.

रा. ग. जाधव : "आपल्या जीवन विषयक अनुभवाचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वतः लेखकाने लेखन रूपाने घडवलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय."२

डॉ. आनंद यादव : "आत्मचरित्र म्हणजे लेखकाने स्वतःच्या जीवनाचा काढलेला चैतन्यपूर्ण आलेख होय."३

डॉ. सदा कऱ्हाडे : "स्वतःच्या जीवनाचे दूरस्थपणाने सिंहावलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्याविषयीचे प्रांजळ निवेदन म्हणजे आत्मचरित्र होय."४

डॉ. उषा हस्तक : " स्वतःच्या आयुष्यात जे जसे घडले, ते तसे सांगणे म्हणजे आत्मचरित्र होय."५

वरील अभ्यासकांनी मांडलेली निरीक्षणे व मराठी भाषेतील आत्मचरित्राच्या स्वरूपाचा शोध घेतला असता आत्मचरित्राची संकल्पना स्पष्ट होते. आत्मचरित्राच्या लेखनात प्रांजळपणा, सत्यनिष्ठा, स्वसमर्थन, मुल्यगर्भता व भावरम्यता असते. या सर्व बाबीचा साकल्याने विचार करता आत्मचरित्राबाबतची संकल्पना पुढील प्रमाणे मांडता येईल. 'व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यातील ज्ञात घटना, प्रसंग, अनुभव, आत्मशोधातून निष्पन्न झालेले 'स्व'व्यक्तीमत्त्व याची सत्यनिष्ठेने व तटस्थवृत्तीने संगती लावताना जो एक जीवनपट दृष्टीपथात येतो त्याचे कलात्मक चित्रण म्हणजे आत्मचरित्र होय.' मराठी भाषेमध्ये एकोणिसाव्या शतकापासून आजपर्यंत कितीतरी आत्मचरित्रे लिहिली गेली आहेत, मात्र आजही आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराचे रूप संकेत तयार झालेले नाहीत असे दिसते. याबाबत उषा हस्तक म्हणतात "गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांमध्ये निर्माण झालेल्या आत्मचरित्रपर कृतींचा अभ्यास करून 'आत्मचरित्र'

या वाङ्मयप्रकाराची रूपवैशिष्टे अधोरेखित करता यायला हवीत; परंतु असा प्रयत्न यशस्वी ठरताना दिसत नाही. या अशा लेखनाची परंपरा अखंडितपणे सुरू असली तरी, या परंपरेतून आत्मचरित्रपर लेखनाचे कोणतेही रचनासंकेत निर्माण झालेले दिसत नाहीत."6 आत्मचरित्रात आत्मचरित्र लिहिणारी व्यक्ती आणि त्या आत्मचरित्राचा नायक या दोन्ही व्यक्ती एकच असतात. त्यामुळे आत्मचरित्रात स्वतःच्या जीवनाची कहाणी लिहिताना आपल्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या संपूर्ण आयुष्याचे 'जसे घडले तसे' चित्रण करणे अपेक्षित असते.

आत्मचरित्रातील निवेदन करणारा 'मी' हा आत्मचरित्राचा अविभाज्य घटक असतो. म्हणूनच आत्मचरित्राचे निवेदन प्रथमपुरुषी असते. लेखक ज्या प्रकारचे जीवन जगलेला आहे, त्या प्रकारचे जीवन सर्व वाचकांच्या परिचयाचे असल्याने आत्मचरित्रे सहज आकलनीय असतात. आत्मचरित्र हा एकमेव साहित्यप्रकार आहे की ज्याचे लेखन आत्मचरित्रकाराने स्वतः करणे अपेक्षित असते. मात्र अलीकडच्या काळात काही आत्मचरित्राचे लेखन अन्य व्यक्तीकडून करून घेतले गेल्याचे दिसते. उदा. दादा कोंडके यांचे 'एकटा जीव' चे शब्दांकन अनिता पाध्ये यांनी तर शांताराम बापू यांचे आत्मचरित्र 'शांताराम' याचे शब्दांकन मधुरा जसराज यांनी केले आहे. अशा आत्मचरीत्रास शब्दांकित आत्मचरित्र म्हणता येईल. एकाच व्यक्तीचे आत्मचरित्र एकाच पुस्तकात न येता त्याचे वेगवेगळे खंड केले जातात. कधीकधी जीवनपटाचे भाग करून ते वेगवेगळया पुस्तकामध्ये वेगवेगळया शीर्षकाखाली लिहिले जातात. उदा. आनंद यादवांचे 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती', 'काचवेल', प्र. के. अत्रे यांचे 'कर्हेचे पाणी' (भाग १,२,३,४,५) , कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचे 'माझ्या आठवणी व अनुभववाद' ( खंड 1 व 2) इत्यादी. यास खंडात्मक आत्मचरित्र म्हटले जाते. मराठी वाङ्मयप्रकारात आत्मचरित्राचे कोणतेही ठोस प्रकार सांगितले गेलेले नाहीत. मात्र आत्मचरित्राची मांडणी व आत्मचरित्रात ज्या घटकाला महत्त्व दिले जाते त्यावरून आत्मचरित्राचे वेगवेगळया प्रकारात वर्गीकरण करता येऊ शकते. पाश्चात्त्य विचारवंत विल्यम सी. स्पेंजमन या ग्रंथकाराने ' दि फॉर्मस ऑफ ऑटोबायोग्राफी ' या ग्रंथात अ) सामाजिक व्यक्तींचे आत्मचरित्र ब) खासगी व्यक्तींचे आत्मचरित्र असे प्रमुख दोन प्रकार तर क) तत्वज्ञानात्मक आत्मचरित्र (Philosophycal Autobiography) ड) इतिहासात्मक आत्मचरित्र (Historyical Autobiography) व सहित्यरूपात्मक आत्मचरित्र (Poetic Autobiography ) असे तीन उपप्रकार सांगितले आहेत.

**आत्मकथन आणि स्वकथन संकल्पना व स्वरूप :**

प्रारंभीच्या काळात आत्मकथन, आत्मनिवेदन, स्वकथन या सर्वांना समानार्थी म्हणून आत्मचरित्र हीच संज्ञा वापरली जात होती. मात्र कालपरत्वे आत्मकथन ही स्वतंत्र संकल्पना रूढ झाली. याबाबत डॉ. मनोहर जाधव म्हणतात "दलित साहित्य प्रवाहात विपुल आत्मकथने लिहिली गेल्यामुळे मराठीत आत्मकथन संज्ञेची प्रस्थापना झालेली आढळते. एरवी आत्मचरित्र हीच संज्ञा वापरात होती असे दिसते. उतारवयात आत्मचरित्र लिहिण्याचे संकेत या आत्मकथनांनी मोडलेले दिसतात."7 आत्मकथनामध्ये केवळ एकट्या आत्मकथनकाराचेच जीवन चरित्र येते असे नाही; तर त्याच्या बरोबर त्याच्या संपूर्ण समाजाचे जीवनचित्रण येत असते. या बाबत प्रा. चंद्रकुमार नलगे व डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात "दलित आत्मकथन सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक संदर्भाशिवाय असू शकत नाही. तो त्याचा अविभाज्य भाग आहे हे निर्विवाद. आत्मकथन हे व्यक्ती मनाचे असले तरी त्यातून समाजाचे दर्शन घडते. त्या व्यक्तीबरोबर जणू समाजच बोलत आहे असे लक्षात येते. कथन हे सातत्याचे प्रतीक आहे. तर कथेला शेवट असतो. ती पूर्णत्वाचा प्रत्येय देते. ती कुठेतरी थांबते. आत्मकथनाचा प्रवास मात्र सुरूच असतो. या दृष्टीने विचार करू जाता दलित आत्मकथन ही संज्ञा अधिक अर्थपूर्ण व अन्वर्थक आहे."8 अशोक पाटील यांनी सर्वात प्रथम आत्मकथन लेखनाला 'स्वकथन ' हा शब्द वापरलेला दिसतो. ते म्हणतात, "भारतीय समाज जीवनात जो समाज संस्कृतीच्या नावाखाली तुडवला गेला, ज्याला रीतिरिवाज, परंपरा व नीतिमूल्यांच्या नावाखाली हिंदु समाजाने स्वतःचे दास म्हणून वागविले त्या समाजाच्या भावनेच्या कोंडीचा, पिढ्यानपिढ्या मुक्या असलेल्या मनाचा, त्याच्या वेदनांचा शब्दाविष्कार म्हणजे दलितांचे स्वकथन."9 आत्मकथन व स्वकथन याचा वाङ्मयीन रूपबंध समान आहे. या दोन्ही लेखन प्रकाराची संकल्पना पुढील प्रमाणे सांगता येईल. 'शिक्षणाने व आंबेडकरी प्रेरणेने जागृत झालेली व्यक्ती धर्म, संस्कृती, परंपरा, यातून निर्माण झालेल्या अनिष्ट चालीरीतीच्या पार्श्वभूमीवर स्वतःच्या व दलितांच्या वाट्याला आलेल्या अन्यायकारी जीवनाचे वास्तववादी चित्रण हे आपल्यावरील अन्याय झुगारून देण्यासाठी, त्या विरुद्ध बंड करून आपल्यासारख्या इतरांना पेटवून उठवण्यासाठी व वेदनेचे ओझे हलके करण्यासाठी ऐन उमेदीत करतो तेव्हा त्या लिखानास आत्मकथन अथवा स्वकथन म्हणतात.'

आत्मकथन व स्वकथनासंदर्भात अभ्यासकांनी मांडलेल्या संकल्पना व त्याचा रुपबंध पाहता ही बाब स्पष्ट होते की, पूर्वी आत्मचरित्रे मध्यमवर्गीय व्यक्तीच आयुष्याच्या शेवटी लिहीत परंतु ही परंपरा दलित आत्मकथनकारांनी मोडीत काढून ऐन तारुण्यात आत्मकथने

व स्वकथने लिहिली आहेत. त्यामुळे यात वृद्धापकाळापर्यंतचा जीवनप्रवास येईलच असे नाही. दलित आत्मकथनामध्ये येणारा 'स्व' हा समाजापासून वेगळा काढता येतच नाही. कारण त्याचे दुःख, यातना याच समाजाच्याही दुःख यातना असतात, त्यामुळे आत्मकथनामध्ये 'स्व' बरोबर समाजही केंद्रस्थानी असतो. आत्मकथनातील जीवन प्रवास हा न थांबणारा असतो. धर्म, संस्कृती, परंपरा यांनी आपणास पशुवत जीवन नशिबी आणले या अन्यायाविरुद्ध चीड व्यक्त करून यातनांचे ओझे हलके करावे ही भावना या लेखनाच्या मागे असते. आपल्या वाट्याला आलेला अन्याय, उपेक्षा यामागील कार्यकारणभाव शोधण्याचा आत्मकथनकाराचा प्रयत्न असतो. त्यामुळे आत्मकथनामध्ये चिंतनशीलतेतून भाष्यही केले जाते. म्हणून आत्मकथनात आत्मनिष्ठा व वस्तुनिष्ठता येते. डॉ. आरती कुलकर्णी 'दलित स्वकथन' या ग्रंथात लिहितात की, "आत्मकथनामध्ये चिंतनशील भाष्यही केलेले असते आणि स्वतःच्या दुःखा बरोबरच आपल्या समाजाच्या दुःखी जीवनाची लक्तरे वेशीवर टांगण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे आत्मकथनामध्ये आत्मनिष्ठेबरोबरच वस्तुनिष्ठतेचेही दर्शन घडते."10 अशी ही आत्मकथने "ज्या वयात सांगावे असे वाटते, त्या वयात ते लिहिले जात आहे."11 असे मनोहर जाधव म्हणतात.

दलित आत्मकथनांची भाषाशैली व निवेदनशैली ही त्या-त्या समाजाची व जातीची असते. भाषा अधिक आक्रमक असते. काही अभ्यासक या निवेदनशैलीवर आक्रस्ताळेपणाचा आरोप करतात. अलीकडे 'आत्मकथन' शब्दाऐवजी 'स्वकथन' हा शब्दप्रयोग अधिक केला जातो. याचे कारण नेमके कोणते याचा शोध घेतला असता असे दिसून येते की, आत्मकथन या शब्दांमध्ये 'आत्मा' हा शब्द येतो. आत्मा हा शब्द सर्व समाजव्यवस्थेचे दैवी समर्थन करणारा शब्द असल्याने सर्व प्रस्थापित समाजव्यवस्था नाकारणाऱ्या अभ्यासकांना तो मान्य नाही. म्हणून 'आत्मकथन' ऐवजी 'स्वकथन' असा शब्द वापरला जाऊ लागला. याबाबत डॉ. यशवंत मनोहर12 म्हणतात "आत्मकथन किंवा आत्मचरित्र या शब्दांमध्ये येणारा ' आत्मा ' हा शब्द सोबतीला कर्मविपाकाचा लज्जास्पद आणि खोटारडा सैद्धांतिक पसारा घेऊन येतो. वर्ण, जाती, गरिबी, श्रीमंती आणि इतरही सर्वच संदर्भांनी होणारे शोषण न्यायाचा भाग आहे. असा दांभिक विचार सोबतीला आणून वरील सर्वच प्रकारच्या कुरूपतेचे दैवीसमर्थन घेऊन तो येतो." "आंबेडकर समाजाच्या शोषणाची केंद्रवर्ती आधारशिला असलेला 'आत्मा' हा शब्द त्यांच्या स्वकथनांना लावणे हे त्यांच्या नास्तिक प्रेरणेला गुलालबुक्का लावण्यासारखे आहे." त्यामुळेच आंबेडकरवाद्यांच्या आत्मकथनाला अलीकडील काळात 'स्वकथन' ही संकल्पना वापरली जात असल्याचे दिसते.

**आत्मपर स्फुटलेखन :**

आत्मपर साहित्यामध्ये लेखक स्वतःच्या जीवनप्रवासात आलेले स्वानुभव व स्वचरित्र लिहित असतो. हे आत्मप्रकटीकरण करताना लेखक कधी जन्मापासून ते वृद्धापकाळापर्यंतचे लेखन करतो, कधी ऐन उमेदीत वयाच्या तिशी चाळिशीत असताना गत आयुष्याचे चित्रण करतो; तर कधी कधी सलग, विस्तृत व पूर्ण जीवनपट न घेता प्रसंगापरत्वे आपली जीवन कहाणी, स्वानुभव, आत्मचिंतन, आत्मशोध हा लेखनामधून मांडत असतो. ही अभिव्यक्ती तो खाजगी पत्रांमधून, मुलाखतीमधून, दैनंदिनी, रोजनामे (जर्नल्स), ख्रिस्ती धर्मातील पापनिवेदनामधून, आत्मनिवेदनामधून, स्मृतीचित्रांमधून, संस्मरणीकेमधून करत असतो. खाजगी पत्रातील लेखनप्रकार पुष्कळदा विशिष्ट व्यक्तीसाठी व विशिष्ट व्यक्तिगत संदर्भात हाताळले जात असतात. या लेखन प्रकाराला तत्कालीन व प्रासंगिक पार्श्वभूमी असल्याने त्याचा आशय आणि अर्थवत्ता ही मर्यादित असते. संस्मरणिका आणि स्मृतिचित्रे यांत बरेचसे साम्य असते. मात्र संस्मरणिकेत लेखक जे व्यापक अनुसंधान ठेवतो, तसे ते काहीशा त्रोटक आणि स्वायत्त स्मृतिचित्रांत नेहमीच आढळेल, असे नाही. आत्मचरित्र आणि संस्मरणिका यांतही फरक आहे. अनेकदा त्यांचा निर्देश समानार्थी होतो हे खरे; परंतु सूक्ष्मपणे पाहिल्यास, संस्मरणिकेत लेखकाचा भर बहुधा इतर व्यक्तींवर व त्यांच्या अनुभवांवर असतो. आत्मचरित्र एककेंद्री असते आणि संस्मरणिका एककेंद्री नसते.

काही व्यक्तीना दैनंदिनी लिहिण्याची सवय असते. यामध्ये स्वतःस दिवसभरात आलेले अनुभव, भेटलेल्या व्यक्ती यांचे चित्रण तो करत असतो. ख्रिस्ती धर्मामध्ये अशी एक प्रथा आहे कि आपण ज्या बऱ्या-वाईट गोष्टी केल्या त्याची कबुली परमेश्वराकडे दिली तर परमेश्वर आपणास माफ करतो. या हेतूने आत्मपर लिखान केले जाते. या मध्येही सलग जीवनपट न येता प्रसंगापरत्वे केलेले लिखान असते. कधी प्रसंगापरत्वे व विशिष्ट हेतूने लेख, स्मृती लिहिल्या जातात. त्यामधेही आत्मानुभव व आत्माविष्कार आलेला असतो. आत्मनिवेदन या प्रकारामध्ये विशिष्ट हेतूशी प्रामाणिक राहून विशिष्ट माहिती पुरविण्यावर भर असतो. निवेदकाच्या भूमिकेत ' मी ' वावरत असताना त्याच्या सभोवती ज्या घटना प्रसंग घडतात त्याचे चित्रण लेखक करत असतो. खाजगीपत्रे, मुलाखती, दैनंदिनी, पापनिवेदने, आत्मनिवेदने, स्मृतीचित्रे, संस्मरणीका या प्रकारातील लेखन हे आत्मचरित्रपर लेखनप्रकारासाठी एक प्रकारची कच्ची सामग्री म्हणून उपयोग होऊ शकतो. थोडक्यात असे म्हणता येईल की, आत्मपर लेखनाचे जे अनेक प्रकार संभवतात, ते

एकमेकांस पूरक असले तरी एकमेकांचे पर्यायी ठरू शकत नाहीत.

**समारोप :**

आत्मपर साहित्यामध्ये मानवाच्या जीवनातील विविध अनुभव, घटना, प्रसंग, आत्मशोध, आत्मचिंतन, जीवनपट, भेटलेल्या व्यक्ती इत्यादींचे चित्रण आलेले असते. या मध्ये लेखक स्वत:च्या इच्छेनुसार व गरजेनुसार तो आपल्या संपूर्ण आयुष्याचे चित्रण करत असतो; तर कधी अर्ध्या आयुष्याचे, कधी मोजक्या घटना प्रसंगाचे, अनुभवाचे चित्रण करीत असतो. त्याने निवडलेल्या जीवनाच्या कालखंडानुसार व आशयानुसार आत्मपर लेखनाचे विविध प्रकारात वर्गीकरण केले जाते. त्यामुळे आत्मचरित्र, आत्मकथन, आत्मकथा, आत्मनिवेदन, स्वकथन, पत्रव्यवहार, मुलाखती, दैनंदिनी, रोजनामे, पापनिवेदने, स्मृतिचित्रे, संस्मरणिका यासारखे आत्मपर सहित्याचे प्रकार पडतात. आत्मकथने व स्वकथने ही काही अपवाद वगळता लेखकाने ऐन उमेदीच्या वयात लहिलेली असून दलितांच्या वाट्याला आलेल्या अन्यायकारी जीवनाची वास्तववादी अभिव्यक्ती, अन्याय विरुद्ध बंड, इतरांना पेटवून उठवणे व वेदनेचे ओझे हलके करणे हा आत्मकथन अथवा स्वकथनामागील उद्देश दिसून येतो.

**संदर्भ सूची :**


1. Encyclopedia Britannica, Vol.2, London, 1768,P854
2. मराठी विश्वकोश खंड 2, म.रा.सा.सं. मंडळ. संपा.रा.ग.जाधव, पृ. ११
3. आत्मचरित्र मीमांसा, आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथमावृत्ती 1998 पृ. 126
4. चरित्र आणि आत्मचरित्र, स.दा. कऱ्हाडे, लोकवाङ्मय गृह, मुंबई. 1976, पृ. 23
5. मराठीतील आत्मचरित्रपर लेखन, उषा हस्तक, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. प्र.आ.2006, पृ.१६
6. तत्रैव, पृ.१२
7. दलित स्त्रियांची आत्मकथनेः स्वरूप आणि चिकित्सा, मनोहर जाधव, सुविद्या प्रकाशन, पुणे, 2001 पृ. 31
8. दलित आत्मकथन, चंद्रकुमार नलगे व गंगाधर पानतावणे, प्रस्तावना, सुरेश एजन्सी, पुणे. प्र. आ. 1986
9. दलितांचे स्वकथन, अशोक पाटील, अनुष्टुभ, जुलै-ऑगस्ट 1981.
10. दलित स्वकथने : साहित्य रूप, आरती कुलकर्णी, विजय प्रकाशन, नागपूर. प्र.आ. १९९१, पृ. 30
11. दलित स्त्रियांची आत्मकथने : स्वरूप आणि चिकित्सा, मनोहर जाधव, सुविद्या प्रकाशन, पुणे. प्र. आ. 2001, पृ. 20
12. दलित स्वकथने, यशवंत मनोहर, ऋतुगंध, दिवाळी अंक, 1987.